**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## चिद्यापीठातील डॉ. महेंद्रकुमार राय यांना सर्वोच्च २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये जागतिक नामांकन प्राप्त
## विद्यापीठाच्या नावलौकिकात आणखी भर
## कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले अभिनंदन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. महेंद्रकुमार राय यांना भारतामध्ये नॅनोसायन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजी विषयात विशेष योगदान देणाऱ्या सर्वोच्च २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये जागतिक स्थान प्राप्त झाले असून त्यांना भारतातून तिसऱ्या क्रमांकाचे नामांकन मिळाले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठ, कॅलिफोर्निया, अमेरिका येथील शास्त्रज्ञांनी नुकत्याच केलेल्या सर्व्हेनुसार भारतातील विविध विषयांमध्ये संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या योगदानावर आधारित भारतीय व जागतिक नामांकनाची यादी नुकतीच जाहीर केली, ते जागतिक नामांकन यादीत ३७२ व्या स्थानी असून ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे. डॉ. राय यांच्या यशाबद्दल विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडली असून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, जीवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सदर सर्व्हेचा पाया हा प्रत्येक शास्त्रज्ञांच्या स्कोपस उध्दरण (स्कोपस इन्डेक्स) वर आधारित होता. डॉ. राय यांचे संशोधन हे विशेषतः जैविक घटकांचा वापर करुन विविध नॅनोकण बनविणे आणि त्यांचा उपयोग स्वास्थ, शेती, पर्यावरण, शाश्वत विकास आदी विविध क्षेत्रांमध्ये कसा करता येईल, यावर आधारित आहे. डॉ. राय यांना नुकतेच दोन विषयांमध्ये पेटेन्ट मंजूर झाले आहे.

डॉ. राय हे सध्या विद्यापीठातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून निकोलस कोपर्निकस विद्यापीठ, टोरुन, पोलंड येथे व्हिजिटींग प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. डॉ. राय यांनी नॅनोटेक्नॉलॉजी विषयामध्ये केलेल्या संशोधनाची राष्ट्रीय व जागतिक पातळीवर दखल घेतली जात असल्याचे मत विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी व्यक्त केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३०/१०/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी